0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांचे दिनांक ३१/०१/२०१२ रोजी प्राप्त पत्रासोबत पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे यांचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०४/२०१२/जा.९१, दिनांक २३/०२/२०१२, १२/०३/२०१२, २१/०३/२०१२ व ०९/०४/२०१२.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/ प्र.क्र.०४/२०१२/जा.९२, दिनांक २३/०२/२०१२.

४) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे आदेश क्र. फप/खाचौ/१२/३/तपा/ १२/प्र.क्र.०३/जा.९९० दिनांक १४/०२/२०१२ अन्वये फिरते अधिकृत दुकान क्र. १ च्या प्राधिकारपत्राचे निलंबन आदेश.

५) आदेश क्र. निशि/मागणी/२०१२/प्र.क्र.०४/जा. २५४ दिनांक १२/०३/२०१२ अन्वये मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा.लि. या संस्थेच्या प्राधिकारपत्राचे निलंबन आदेश.

६) ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे चालक तायप्पा भागवत पात्रे व ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे मालक उमेश परशुराम गायकवाड यांचे दिनांक २०/०३/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

७) अ.शि.दु.क्र. ४१ फ/२७९ चे प्राधिकारपत्रधारक श्रीमती शांता विठ्ठलजी बरडे, अ.शि.दु.क्र. ४१ फ/३४८ चे प्राधिकारपत्रधारक श्री. प्रमोद कुमार मिश्रा यांचे वतीने श्री. अनिल मिश्रा व अ.शि.दु.क्र. ४१ फ/१७० चे प्राधिकारपत्रधारक श्री गणेश ग्राहक सहकारी संस्था मर्यादितचे चेअरमन श्री. अनिल ठाणेकर यांचे दिनांक १७/०४/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०४/२०१२/जा. ४६५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :- ०८ /०७/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १७/०१/२०१२ रोजी रबाळे पोलिस ठाणे यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, स्वास्तिक किराणा मालाचे दुकान, देशमुख वाडी, सेक्टर १, ऐरोली, नवी मुंबई येथे रात्रौ २२.३० वाजताच्या

सुमारास एका ट्रकमधून रेशनिंगचे तांदूळ उतरणार आहेत. मिळालेल्या बातमीनुसार रबाळे पोलिस ठाणे येथील पोलीस पथक, पंचासमवेत उक्त ठिकाणी गेले असता ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ हा सदर दुकानाच्या समोर उभा होता. त्यावेळी पथकाने नमुद ट्रक वरील चालकाचा शोध घेतला असता बाजूस असलेल्या स्वास्तिक ट्रेडर्स या किराणा मालाच्या दुकानात ५ इसम बसलेले होते. त्यापैकी हातात पावती घेऊन बसलेला इसम याने तो नमूद ट्रकचा चालक असल्याचे सांगितले. सदर ट्रकच्या खाली तांदळाचे दाणे पडलेले होते तसेच ट्रकमध्ये गोण्या भरलेल्या होत्या. त्यावेळी स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानामध्ये बसलेला नमूद ट्रकवरील चालक यास त्याच्या ताब्यातील ट्रकमध्ये काय आहे ? याबाबत विचारपूस केली असता त्याने रेशनिंगचे तांदळाचे गोणी तो रेशनिंगच्या दुकानात विक्री करीत असल्याचे सांगितले. त्यावेळी नमूद चालक यास पथकाने विश्वासात घेऊन सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारले असता त्याने तो बसलेला स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानात त्याच्या ट्रकमधील प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण २६ तांदळाने भरलेल्या गोण्या नमूद दुकानदारास रुपये १९,०००/- मध्ये विकले असल्याचे सांगितले. त्यावरुन पोलिस पथकास मिळालेल्या माहितीची खात्री झाल्याने नमूद ट्रक चालक यास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव तायप्पा भागवत पात्रे असे सांगितले. स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानाच्या मालकाबाबत विचारणा केली असता टेबलासमोर बसलेल्या इसमाने तो स्वत: मालक असल्याचे सांगून त्याने त्याचे नांव श्रीनिवास तनसुखराम गोयल असे सांगितले. सदर इसमास स्वास्तिक ट्रेडर्स हे अधिकृत रेशनिंग दुकान आहे अगर कसे ? असे विचारले असता त्याने ते रेशनिंगचे दुकान नसून त्यांच्या मालकीचे किराणा मालाचे दुकान असल्याचे सांगितले.

तद्नंतर पथकासोबत आलेल्या रेशनिंग अधिकारी श्री. वानखडे यांनी स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानात सदर ट्रकमधून उतरवून ठेवलेले तांदूळ तपासले तसेच सदर ट्रकचा चालक तायप्पा भागवत पात्रे याच्याकडे केलेली चौकशी तसेच त्याच्या जवळ मिळालेली एफ.सी.आय. चे डिलिव्हरी चलन याची तपासणी करुन स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानात उतरविलेल्या २६ तांदळाच्या गोणी तसेच ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ मधील तांदळाच्या पोत्यांची पाहणी केली असता, त्यांनी खात्री करुन रेशनिंगचे तांदूळ असल्याचे सांगितले. श्री. वानखडे यांनी स्वास्तिक ट्रेडर्स या किराणा दुकानाचे मालक व ट्रक चालक यांना सदर तांदूळ हे त्याच्या दुकानात विकण्याचे कारण विचारता ते कोणतेही समर्पक उत्तर देऊ शकले नाहीत. त्यावेळी पथकाने ट्रक चालक याच्याकडे चलना प्रमाणे कोणकोणत्या रेशनिंग दुकानात तांदळाच्या गोण्या विक्री केले असल्याचे विचारले असता, चलनावरील अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते), सेक्टर १०, ऐरोली, नवी मुंबई या शिक्क्या व्यतिरिक्त असलेल्या इतर शिक्क्यांचा रेशनिंग दुकानावर तांदळाच्या गोण्या वितरीत केल्या असल्याचे सांगून

CONTROLLER OF RATIONING ... HEA

स्वास्तिक ट्रेडर्सचे मालक गोयल यांच्याकडे विक्री केलेल्या २६ तांदळाच्या गोण्या या अधिकृत अन्नपूर्णा ग्राहक संस्थेला वितरीत केल्या आहेत असे भासवण्यासाठी नमूद संस्थेचा बनावट शिक्का श्रीनिवास गोयल यांनी चलनावर मारुन त्यावर त्याची सही केली असल्याचे सांगितले. त्यावेळी पथकाने व शिधावाटप अधिकारी श्री. वानखडे यांनी दुकानाची बारकाईने पाहणी केली असता सदर दुकानातील पश्चिमेकडील कोपऱ्यातील टेबलाच्या खणातून खालील नमूद रबर स्टॅम्प असल्याचे दिसून आले.

१) अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते), २)अधिकृत शिधावाटप दुकांन क्र. ४१ फ/२४३, ३) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/२ (फिरते), ४) ४१ फ/२ (फिरते) व ५) अन्नपूर्णा ग्राहक सहकारी सं. मर्या. अधि. शिधावाटप (फिरते) फ २.

स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानाचे मालक श्रीनिवास गोयल याचे अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था हे दुकान नसतानाही त्याने सदर दुकानाचा स्टॅम्प बनवून त्याचा वापर करुन सार्वजनिक वितरण संस्थेचा तांदूळ त्याच्या दुकानात विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर बाबत पंचासमक्ष सविस्तर पंचानामा करुन त्यानंतर विक्री केलेले २६ रेशनिंगच्या तांदळाच्या गोण्या नमूद ट्रकमध्ये भरुन इतर अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये वितरीत करण्यासाठी शिल्लक असलेल्या रेशनिंगचा ७० तांदळाच्या गोण्या सुरक्षिततेसाठी ताब्यात घेऊन ट्रकचे चालक व दुकान मालक यांना पोलिस स्टेशनला आणण्यात आले.

अशाप्रकारे ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चा चालक तायप्पा भागवत पात्रे याने त्याच्या ताब्यात अधिकृत शिधावाटप दुकानामध्ये वितरीत करण्यासाठी दिलेला तांदूळ त्याने अधिकृत शिधावाटप दुकानात न उतरविता तो स्वास्तिक ट्रेडर्स या खाजगी किराणा मालाचे दुकान मालक श्रीनिवास तनसुखराम गोयल याचेशी संगणमत करुन प्रत्येकी ५० किलो वजनाच्या २६ तांदळाच्या गोण्या त्यांना विक्री करुन त्याच्या दुकानात उतरविल्या व सदर माल अधिकृत अन्नपूर्णा ग्राहक संस्था या शिधावाटप दुकानात उतरविला असे भासविण्यासाठी दुकान मालक श्रीनिवास गोयल यांनी त्याच्याकडे अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते), सेक्टर १०, ऐरोजी, नवी मुंबई असा बनावट शिक्का चलनावर मारुन त्याची सही केली असल्याने, दोघांने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३,७, ८ व १०, महाराष्ट्र फुड ग्रेन रेशनिंग (सेकंड) रेग्युलेशन ॲक्ट, १९६६ चे कलम १८ अे ३ बी, सी , महाराष्ट्र फुड ग्रेन रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम १ व ९, बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल्ड, कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ३ व ८ तसेच भारतीय दंड

विधान १८६० चे कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४७०, ४७१ व ४७२ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २६/२०१२ दि.१८/०१/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ | १ नग | २,००,०००/- |
| २. | स्वास्तिक ट्रेडर्स या किराणा दुकानात रेशनिंगचा तांदूळ असलेल्या बारदानाच्या एकूण २६ गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या | १३०० किलो | १९,०००/- |
| ३. | उक्त ट्रकमध्ये तात्पुरत्या स्वरुपात जप्त करण्यात आलेल्या एकूण ७८ गोण्या प्रत्येकी ५० किलो वजनाच्या | ३९०० किलो | - |
| | | एकूण | २,१९,०००/- |

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी नमूद ट्रक व त्यामधील नियंत्रित दराचा तांदळाचा साठा मे.अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस लि. या संलग्न संस्थेचा असल्याचा निर्देशन पत्रावरुन दिसून येते. सदर संस्थेस नेमून देण्यात आलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांना अन्नधान्य वितरणाची जबाबदारी त्यांची असून या प्रकरणी सदर संस्थेच्या ट्रकने त्यांना नेमून दिलेल्या दुकानांना शिधाजिन्नस वितरीत न करता ते खाजगी किराणा दुकानात अनधिकृतरित्या विक्री केल्याचे दिसून येत असल्याने याबाबतचा पुढील तपासाचा परिपूर्ण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई व उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना या कार्यालयाचे पत्र क्र. अनुक्रमे क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०४/२०१२/जा.६६ व ६७, दि. ०३/०२/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यास सूचित करण्यात आले.

पोलीस निरीक्षक, गुन्हे, रबाळे पोलीस ठाणे यांनी त्यांचे दिनांक १४/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आलेल्या नमूद ट्रकमधील शिधावाटप दुकानांना वितरीत होणारा तांदूळ हा यातील आरोपीत यांनी आपसात संगनमत करुन खाजगी किराणा दुकानात अनधिकृतरित्या विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे नमूद केले आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे दि. १४.२.२०१२ रोजीच्या पत्रान्वये मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस लि. या संलग्न संस्थेने भारतीय अन्न महामंडळाच्या भिवंडी येथील गोदामातून ४१-फ, ठाणे शिधावाटप कार्यालयाअंतर्गत एकूण १२ दुकानांकरीता दि.१७.१.२०१२ रोजी १३५ क्विंटल (२८० बाचकी) एवढ्या तांदळाची उचल करुन अधिकृत शिधावाटप दुकानांना वितरीत करणे अपेक्षित होते. तथापि, उचल केलेल्या

CONTROLLER OF RATIONING HEAD MU

तांदळापैकी १३०० कि.ग्रॅ. तांदूळ अधिकृत शिधावाटप दुकानाला वितरीत करण्याऐवजी खाजगी दुकानात उतरविल्यानंतर पोलीसांनी जप्त केला आहे. निर्देशन पत्रामध्ये दर्शविण्यात आलेले वितरण प्रत्यक्ष दुकानात झाले किंवा कसे ? याबाबतचा शिधावाटप अधिकारी, ४१-फ, ठाणे यांच्या अहवालाचे अवलोकन केले असता फिरते दुकान क्रमांक १ च्या साठा पुस्तकात दि. १७.१.२०१२ रोजी तांदळाच्या रकान्यात १३०० किलो आवक दर्शविली असून एकूण १३०० किलो साठा नंतर स्पष्टपणे खोडल्याचे दिसून येत आहे. तसेच नोंदीसमोर मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस या संस्थेचा बिल नं. ४३५५०१ अशी स्पष्ट नोंद दिसून येते. यावरुन फिरते दुकान क्रमांक १ चे चालक यांनी मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस या संस्थेशीं संगनमत करुन अपहार केल्याचे स्पष्ट होत असल्याने फिरते दुकान क्रमांक १ या अधिकृत शिधावाटप दुकानाचे प्राधिकारपत्र वाचावे क्र. ४ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस या संघटित संस्थेने भारतीय अन्न महामंडळाच्या भिवंडी येथील गोदामातून दि. १७.१.२०१२ रोजी उचल केलेला तांदूळ निर्देशन पत्रात नमूद केलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानात वितरीत न करता खाजगी किराणा दुकानात उतरविला असल्याचे पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात आढळून आल्यामुळे मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस या संघटित संस्थेचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात यावे असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा.लि. यांचे प्राधिकारपत्र वाचावे क्र. ५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०६/०३/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०६/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे चालक तायप्पा भागवत पात्रे व ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे मालक उमेश परशुराम गायकवाड हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०३/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सर्व संबंधितांना पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १७/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस अ.शि.दु.क्र. ४१ फ/२७९ चे प्राधिकारपत्रधारक श्रीमती शांता विठ्ठलजी बरडे, अ.शि.दु.क्र. ४१ फ/३४८ चे प्राधिकारपत्रधारक श्री. प्रमोद कुमार मिश्रा यांचे वतीने श्री. अनिल मिश्रा व अ.शि.दु.क्र. ४१ फ/१७० चे प्राधिकारपत्रधारक श्री गणेश ग्राहक सहकारी संस्था मर्यादितचे चेअरमन श्री. अनिल ठाणेकर हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद</u> :-**

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे चालक तायप्पा भागवत पात्रे यांनी युक्तीवाद केला की, रबाळे पोलिस ठाणे येथे दिनांक १८/०१/२०१२ रोजी जो गुन्हा नोंद क्र. २६/२०१२ दाखल करण्यात आला. त्या गुन्ह्यत जो ट्रक आहे. त्या ट्रकचा तो चालक आहे. तो ट्रक त्याने दिनांक १७/०१/२०१२ रोजी एफ.सी.आय. भिवंडी ते ऐरोलीसाठी भरला होता. परंतू सदर विभाग त्याला नविन होता. तेथे तो पहिल्यांदा त्याचे भाडे घेऊन गेला होता. फोन करुन गाडी खाली करीत होता. अशाप्रकारे त्याने ८ दुकाने खाली केले व ९ व्या दुकानाला जात असताना त्याला पोलिसांनी अडविले व पोलिस स्टेशनला घेऊन काही न विचारता गुन्हा नोंदवला. त्याला काही न विचारता ह्या गुन्ह्यात फसविले गेले आहे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे मालक उमेश परशुराम गायकवाड यांनी युक्तीवाद केला की, रबाळे पालिस ठाणे येथे दिनांक १८/०१/२०१२ ट्रक आहे. तो त्याच्या मालकीचा आहे. सदर ट्रक तो भिवंडी येथे भाड्याने पाठवत असतो. दिनांक १७/०१/२०१२ रोजी त्याने त्याचा ट्रक

CONTROLLER OF RATIONING ... HEAD

मे. अन्नपूर्णा सप्लाय या संस्थेस भाड्याने दिला होता. ही बाब खरी आहे. परंतू वितरणासाठी झालेल्या गुन्ह्याबद्दल त्याला थोडी देखील कल्पना नव्हती, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/२७९ चे प्राधिकारपत्रधारक श्रीमती शांता विठ्ठलजी बरडे यांनी युक्तीवाद केला की, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/२७९ या शिधावाटप केंद्रामध्ये ए.पी.एल. तांदूळ हा मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक रबाळे पोलिस ठाणे यांनी मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामध्ये त्यांना त्याची कोणतीही कल्पना नव्हती. त्यांनी अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था (मर्या) मुलूंड, मुंबई यांच्याकडे शिधाजिन्नसांची रितसर मागणी केलेली होती. परंतू सदर ए.पी.एल. तांदूळ दिनांक ०३/०१/२०१२ रोजी भरुन देखील त्यांना वितरण का होत नाही, याबाबत विचारणा केली असता, त्यांना झालेला प्रकार कळ्लेला आहे. शिधावाटप निरिक्षक श्री. तांबे यांनी ए.पी.एल. तांदूळ दिनांक ०७/०३/२०१२ रोजी त्यांना दिलेला आहे व त्यांनी शिधापत्रिकाधारकांना वितरण केलेला आहे. त्यांना या प्रकारची कोणतीही कल्पना नव्हती किंवा सदर शिधाजिन्नस पोहच करणारी गाडी त्यांच्या शिधावाटप केंद्र क्र. ४१ फ २७९ मध्ये आलेली नाही. त्यांच्याकडून अनवधानाने चूक झाली असेल तर त्यांना क्षमा करावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१७० चे प्राधिकारपत्रधारक श्री गणेश ग्राहक सहकारी संस्था मर्यादितच्या वतीने चेअरमन श्री. अनिल ठाणेकर यांनी युक्तीवाद केला की, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१७० या शिधावाटप केंद्रामध्ये ए.पी.एल. तांदूळ हा वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे यांनी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्या संदर्भात त्यांना कोणतीही कल्पना नव्हती. त्यांनी अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था (मर्या) मुलूंड, मुंबई यांच्याकडे शिधाजिन्नसांची रितसर मागणी केलेली होती. परंतू सदर तांदूळ दिनांक ०३/०१/२०१२ रोजी भरुन देखील त्यांना वितरण का होत नाही, याबाबत विचारणा केली असता, त्यांना झालेला प्रकार कळ्लेला आहे. शिधावाटप निरिक्षक श्री. तांबे यांनी ए.पी.एल. तांदूळ दिनांक १६/०३/२०१२ रोजी त्यांना दिलेला आहे व त्यांनी सदर तांदूळ शिधापत्रिकाधारकांना वितरण केलेला आहे. त्यांना या प्रकारची कोणतीही कल्पना नव्हती याची नोंद घ्यावी. याबाबत त्यांनी कोणताही कसूर केलेला नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/३४८ चे प्राधिकारपत्रधारक श्री. प्रमोद कुमार मिश्रा यांच्या वतीने उपस्थित श्री. अनिल मिश्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे भाऊ श्री. प्रमोद मिश्रा काही कामानिमित्त दिनांक १६/०४/२०१२ रोजी बाहेर गेलेले असल्याने ते त्यांच्या

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE

वतीने सुनावणीस उपस्थित राहत असून दिनांक ०३/०१/२०१२ रोजी मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हिस, भिवंडी यांच्या कार्यालयात ए.पी.एल. तांदळाची मागणी केलेली होती. दिनांक २०/०१/२०१२ रोजी तांदळाची आवक झालेली नाही. त्यांना या संदर्भात काही माहिती नाही. दिनांक ०७/०३/२०१२ रोजी शिधावाटप निरिक्षक यांचेमार्फत रबाळे पोलिस स्टेशन यांनी जप्त केलेल्या तांदळाची आवक झाल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १७/०१/२०१२ रोजी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे यांच्या अधिपत्याखालील पथकाने मिळालेल्या बातमीनुसार पंचांसमवेत स्वास्तिक किराणा मालाचे दुकान, देशमुख वाडी, सेक्टर १, ऐरोली, नवी मुंबई येथे सुमारे २२.३० वाजता ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ हा दुकानाच्या समोर उभा असलेल्या ट्रकमधून स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानात सदर ट्रकमधील प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण २६ तांदळाने भरलेल्या गोण्या नमूद दुकानदारास रुपये १९,०००/- मध्ये विकले असताना पोलिस पथकाने रंगेहात पकडले आहे. सदर ट्रकचा चालक तायप्पा भागवत पात्रे याच्याकडे केलेली चौकशी तसेच त्याच्या जवळ मिळालेली एफ.सी.आय. चे डिलिव्हरी चलन याची तपासणी करुन स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानात उतरविलेल्या २६ तांदळाच्या गोणी तसेच ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ मधील उर्वरित प्रत्येकी ५० किलो वजानाच्या ७८ तांदळाच्या पोत्यांची पाहणी केली असता, सदरचा साठा हा रेशनिंगचा असल्याचे पथकास खात्री झाली. स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानाचे मालक श्रीनिवास गोयल यांचे अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था हे दुकान नसतानाही त्याने सदर दुकानाचा स्टॅम्प बनवून त्याचा वापर करुन सार्वजनिक वितरण संस्थेचा तांदूळ त्याच्या दुकानात विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर बाबत पंचासमक्ष सविस्तर पंचानामा करुन त्यानंतर विक्री केलेले २६ रेशनिंगच्या तांदळाच्या गोण्या नमूद ट्रकमध्ये भरुन इतर अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये वितरीत करण्यासाठी शिल्लक असलेल्या रेशनिंगचा ७८ तांदळाच्या गोण्या ताब्यात घेऊन ट्रकचे चालक व दुकान मालक यांना व इतर यांचेविरुध्द गुन्हा नोंद करुन उपरोक्त ट्रक व नमूद तांदळाचा साठा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/२७९ चे प्राधिकारपत्रधारक श्रीमती शांता विठ्ठल बरडे, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१७० चे प्राधिकारपत्रधारक श्री गणेश ग्राहक सहकारी संस्था

CONTROLLER OF RATIONING HEAD MU

मर्यादितच्या वतीने चेअरमन श्री. अनिल ठाणेकर व अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/३४८ चे प्राधिकारपत्रधारक श्री. प्रमोद कुमार मिश्रा यांच्या वतीने उपस्थित श्री. अनिल मिश्रा यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था (मर्या) मुलूंड, मुंबई यांच्याकडे शिधाजिन्नसांची रितसर मागणी केलेली होती. परंतू सदर ए.पी.एल. तांदळाच्या साठयाची त्यांना आवक झाली नसल्याचे सांगितले आहे.

तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, गुन्हे, रबाळे पोलीस ठाणे यांनी सादर केलेल्या अभिवेदनामध्ये, जप्त करण्यात आलेल्या नमूद ट्रकमधील शिधावाटप दुकानांना वितरीत होणारा तांदूळ हा यातील आरोपीत यांनी आपसात संगनमत करुन खाजगी किराणा दुकानात अनधिकृतरित्या विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे नमूद केले आहे. तसेच पोलिस पथकास मे. स्वास्तिक ट्रेडर्स या खाजगी दुकानाच्या पश्चिमेकडील कोपऱ्यातील टेबलाच्या खणातून काही अधिकृत शिधावाटप दुकानांचे रबर स्टॅम्पही आढळून आले आहे.

जप्त करण्यात आलेल्या ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे चालक तायप्पा भागवत पात्रे यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, सदर ट्रकचा तो चालक असुन त्याने दिनांक १७/०१/२०१२ रोजी एफ.सी.आय. भिवंडी ते ऐरोलीसाठी तांदूळ भरला होता. परंतू सदर विभाग त्याला नविन असल्याने तो पहिल्यांदा त्याचे भाडे घेऊन गेल्याचे सांगुन तो फोन करुन गाडी खाली करीत असल्याचे सांगितले. अशाप्रकारे त्याने ८ दुकाने खाली केले व ९ व्या दुकानाला जात असताना त्याला पोलिसांनी अडविले व पोलिस स्टेशनला घेऊन त्याला काही न विचारता गुन्हा नोंदवुन ह्या गुन्ह्यात फसविले गेले असे सांगुन त्यांनी मोघम स्वरुपाचे निवेदन सादर करुन या कार्यालयाची दिशाभुल करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा. लि. या संलग्न संस्थेने भारतीय अन्न महामंडळाच्या भिवंडी येथील गोदामातून ४१-फ, ठाणे शिधावाटप कार्यालयाअंतर्गत एकूण १२ अधिकृत शिधावाटप दुकानांना वितरीत करण्यासाठी ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ मधून दिनांक १७/०१/२०१२ रोजी २८० बाचक्यांमध्ये १३५२० किलो तांदळाच्या साठ्याची उचल केली. त्या अनुषंगाने घटनास्थळी प्राप्त भारतीय खाद्य निगमचे डिलिव्हरीमेमो क्र.१२७६५३ व निर्देशन पत्र भाग-२ अन्वये अ.शि.वा. दुकान क्र. ४१-फ-१६, ४३६, ४३९, ४४१, ४४२, ३६३, १७४ व ३६० या दुकानांना एकूण ८३२० किलो वितरण केल्याचे दिसून येते. तद्नंतर सदर ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ मधील उर्वरित ५२०० किलो तांदळाचा साठा हा अ.शि.वा. दुकान क्र. ४१-फ-फिरते दुकान १, ४१-फ-२७९, ३६० व ३४८ या चार दुकानांना वितरीत करणे आवश्यक असताना मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा. लि. या संलग्न संस्थेने नियुक्त केलेल्या सदर ट्रक चालकाने ट्रकमधील शिल्लक असलेल्या ५२०० किलो तांदळाच्या साठ्यापैकी २६

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

बाचक्यांमधील १३०० किलो तांदळाचा साठा हा श्रीनिवास तनसुखराम गोयल यांच्या मालकीचे ऐरोली येथील मे. स्वास्तिक ट्रेडर्स या खाजगी किराणा मालाच्या दुकानात १९०००/- रुपयांमध्ये काळेबाजाराने विक्री केले असताना पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा. लि. या संलग्न संस्थेच्या निर्देशन पत्रामध्ये दर्शविण्यात आलेले वितरण प्रत्यक्ष दुकानात झाले किंवा कसे ? याबाबतचा शिधावाटप अधिकारी, ४१-फ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता मे. अन्नपूर्णा सहकारी ग्राहक संस्था यांचे फिरते दुकान क्रमांक १ च्या साठा पुस्तकात दिनांक १७/०१/२०१२ रोजी तांदळाच्या रकान्यात १३०० किलो आवक दर्शविली असून एकूण १३०० किलो साठा नंतर स्पष्टपणे खोडल्याचे तसेच सदर नोंदीसमोर मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा.लि. या संस्थेचे बिल नं. ४३५५०१ अशी स्पष्ट नोंद दिसून येत असल्याचे नमूद केले आहे. यावरुन मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा.लि. या संस्थेने, अधिकृत शिधावाटप फिरते दुकान क्रमांक १ चे चालक मे. अन्नपूर्णा सहकारी ग्राहक संस्था व मे. स्वास्तिक ट्रेडर्सचे मालक यांनी संगनमत करुन १३०० किलो तांदळाचा साठा हा गैरमार्गाने खरेदी-विक्री केले असल्याचे स्पष्ट होत असुन या व्यतिरीक्त सदर ट्रक मधील उर्वरीत ७८ बाचक्यांमधील ३९०० किलो तांदळाचा साठाही मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा.लि. या संस्थेने अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी ट्रकमध्ये बाळगल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त तांदळाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०४/२०१२/जा.९२, दिनांक २३/०२/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

नमूद गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेल्या ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे मालक उमेश परशुराम गायकवाड यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, रबाळे पालिस ठाणे येथील जप्त ट्रक त्याच्या मालकीचा असल्याचे सांगून सदर ट्रक तो भिवंडी येथे भाड्याने पाठविले असल्याचे सांगितले. दिनांक १७/०१/२०१२ रोजी त्याने त्यांचा ट्रक मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा.लि. या संस्थेस भाड्याने दिला होता. ही बाब खरी आहे. परंतू वितरणासाठी झालेल्या गुन्ह्याबद्दल त्याला थोडी देखील कल्पना नव्हती, असे सांगितले. तसेच प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या नमूद ट्रकचे चालक तायप्पा भागवत पात्रे याने घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात, स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानात त्याच्या ट्रकमधील प्रत्येकी ५० किलो वजनाच्या एकूण २६ तांदळाने भरलेल्या गोण्या गैरमार्गाने उतरविले असल्याचे कबुल केले आहे. सदरचा जप्त तांदळाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा असल्याचे माहित असून सुध्दा तो गैरमार्गाने विक्री करण्यासाठी उमेश परशुराम गायकवाड यांच्या मालकीच्या ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चा वापर त्यांच्या चालकाने अवैध वाहतूकीसाठी केल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी ट्रक



CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

मालकाच्या अपरोक्ष जरी चालकाने त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

मे. अन्नपुर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा.लि. या सलंग्न संस्थेस नियतन आदेशानुसार नेमून देण्यात आलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांना अन्नधान्य वितरण करावयाची जबाबदारी असून या प्रकरणी सदर संस्थेने त्यांना नेमून देण्यात आलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांना उक्त ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ मधील तांदळाचा साठा पूर्णपणे वितरीत न करता ट्रकमधील शिल्लक असलेला पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाच्या शासन नियंत्रीत दराच्या तांदळाच्या साठयापैकी एकुण ५२०० किलो तांदळाचा साठा हा अनधिकृतपणे नफेखोरीच्या उद्देशाने काळाबाजारीने विक्री करुन गोरगरीब असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांना शिधाज़िन्नसपासून वंचित ठेवले असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच मे. अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादितचे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते), सेक्टर १०, ऐरोली, नवी मुंबई यांनी साठा पुस्तकात दिनांक १७/०१/२०१२ रोजी तांदळाच्या रकान्यात १३०० किलो आवक दर्शवून एकूण १३०० किलो साठा नंतर स्पष्टपणे खोडल्याचे तसेच सदर नोंदीसमोर मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा.लि. या सलंग्न संस्थेचे बिल नं. ४३५५०१ अशी स्पष्ट नोंद दिसून येत असल्याने त्यांनी मे. अन्नपुर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा.लि. या संलग्न संस्थेशी संगनमत करुन त्यांच्या दुकानास संलग्न असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा अनुदानीत तांदळाचा साठा हा मे. स्वास्तिक ट्रेडर्स या खाजगी किराणा दुकानास विक्री केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस प्रा. लि. या संघटित संस्थेचे प्राधिकारपत्र क्र. सीआर-एए-३७ हे दिनांक १२/०३/२०१२ रोजीच्या व मे. अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित, अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते) यांचे प्राधिकारपत्र हे दिनांक [illegible]/०२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. सदरच्या दोन्ही संस्थांनी त्यांना शासनाच्या [illegible]तीने सोपविण्यात आलेल्या महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडतांना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासन नियंत्रित

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE

दराचा शिधापत्रिकेवर वितरीत होणारा तांदळाचा साठा गैरमार्गाने विक्री करुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याने त्यांनी शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. सदर दोन्ही संस्थेने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३,७, ८, ९ व १० चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. अन्नपुर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा. लि. व मे. अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित या दोन्ही संस्थेचे प्राधिकारपत्र कायमस्वरुपी रद्द करुन प्राधिकारपत्राच्या अनुपालनार्थ त्यांनी भरणा केलेली अनामत रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथें गुन्हा नोंद क्र. २६/२०१२ दिनांक १८/०१/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दिनांक २३/०२/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) मे. अन्नपुर्णा सप्लाय सर्व्हिस प्रा. लि. या संलग्न संस्थेचे प्राधिकारपत्र क्रमांक सीआर-एए-३७ हे तात्काळ रद्द करण्यात यावे व प्राधिकारपत्राच्या अनुपालनार्थ भरणा केलेली संपूर्ण अनामत रक्कम

CONTROLLER OF RATIONING
HEAD

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय यांनी शासनजमा करण्याची कार्यवाही करावी.

५) मे. अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित यांचे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते) या दुकानाचे प्राधिकारपत्र हे उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी तात्काळ रद्द करावे व प्राधिकारपत्राच्या अनुपालनार्थ भरणा केलेली संपूर्ण अनामत रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे चालक तायप्पा भागवत पात्रे
२) ट्रक क्र. एमएच-०४-एच-११९६ चे मालक
३) स्वास्तिक ट्रेडर्स या दुकानाचे मालक श्रीनिवास तनसुखराम गोयल
४) मे. अन्नपूर्णा सप्लाय सर्व्हीस लिमिटेड या संघटित संस्थेचे अध्यक्ष
५) मे. अन्नपूर्णा ग्राहक सहकारी संस्था मर्यादित यांचे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१ (फिरते) चे प्राधिकारपत्रधारक
६) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/२७९ चे प्राधिकारपत्रधारक
७) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/१७० चे प्राधिकारपत्रधारक
८) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/३४८ चे प्राधिकारपत्रधारक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...AI

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित तसेच सुचित करण्यात येते की सदर आदेशाची <u>तात्काळ</u> अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

३) कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कारवाईकरीता अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, दुकान शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कारवाईकरीता अग्रेषित.

५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

~~६)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.